International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 3 Jan-Feb 2024

# कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य

**ऐश्वर्या नामदेव बल्लाळ**
संशोधक विद्यार्थिनी, (BSc, MA. , NET)
**Corresponding Author – ऐश्वर्या नामदेव बल्लाळ**
**Email:** aishwaryaballal18@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14195845**

**प्रस्तावना :**

शिक्षणक्रांतीचे कर्मवीर म्हणजेच कर्मवीर भाऊराव पाटील ऊर्फ अण्णा हे आदर्श व्यक्तीमत्व होते. बहुजन समाजाला ज्ञानाची संजीवनी देणारे ते एक महान धन्वंतरी होते. गोरगरीबांच्या झोपडीपर्यंत ज्ञानगंगा पोहोचवणारे एक आधुनिक भगीरथ होते. अज्ञान, अंधश्रध्दा आणि जाती-धर्माने पहुडलेल्या समाजाला त्यांनी ज्ञानाचे अमृत पाजून त्यातून बाहेर काढले. संपुर्ण आयुष्य त्यांनी शिक्षणप्रसाराला वाहून दिले. तन मन धन त्यासाठी अर्पण केले. शिक्षणाबरोबरच स्वावलंबन शिकवले. श्रम शिक्षणातून स्वावलंबन, प्रतिष्ठा, स्वाभिमान आणि आत्मविश्वास निर्माण करुन तरुणांना मुख्य प्रवाहात आणले. शिक्षणाची संधी मिळू न शिकणाऱ्या झोपडपट्टीतील लोकांपर्यंत ज्ञानगंगा पोहोचवली. महाराष्ट्रात शिक्षणप्रसाराची एक अखंड चळवळ निर्माण केली. त्यासाठी त्यांनी रयत शिक्षणसंस्थेची स्थापना केली. कमवा आणि शिका सारखी उत्कृष्ट पध्दत सुरु करुन सर्वांना शिक्षण क्षेत्रात आणण्याचा प्रयत्न केला.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूरातील कुंभोज या ठिकाणी झाला. त्यांचे मुळ आउनाव देसाई होते. त्यांचे पूर्ण नाव भाऊराव पायगौंडा पाटील होतेः. ते जैन समाजाचे होते. त्यांचे वडील सरकारी खात्यात कारकून होते. वडिलांना नोकरीमुळे सर्वत्र फिरावे लागत असल्यामुळे त्यांना भटकंती करावी लागायची. त्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण वेगवेगळया ठिकाणी झाले. माध्यमिक शिक्षणासाठी त्यांनी राजाराम हायस्कूल, कोल्हापूर येथे प्रवेश घेतला. ते जैन वसतिगृहात राहत असत. पण वसतिगृहाचे नियम न पाळल्याने त्यांना इयत्ता सहावीत वसतिगृह सोडावे लागले. त्यामुळे त्यांचे सहावीपर्यंत शिक्षण झाले. पण सहावीपर्यंत शिकणाऱ्या या मुलाने शिक्षण क्षेत्रात अतुलनीय कार्य केले. शिक्षण सुटले असले तरी ते कुस्ती, मल्लखांब यांसारख्या खेळात तरबेज होते. राजर्षी शाहू महाराजांच्या वाडयात त्यांना आश्रय मिळाला व येथूनच समाजसुधारणेची प्रेरणा मिळाली. १९४९ मध्ये त्यांचा विवाह कुंभोजमधील अण्णासाहेब पाटील यांची मुलगी आदाक्का यांच्याशी झाला पुढे त्यांचे नाव लक्ष्मीबाई ठेवले.

**उद्दिष्ट्ये:**

१. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवनकार्य समजून घेणे.
२. कर्मवीर भाऊराव पाटील व रयत शिक्षण संख्या यांचा आढावा घेणे.
३. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेल्या शिक्षणप्रसाराचा आवाका अभ्यासणे.
४. कर्मवीर भाऊराव पाटील व सत्यशोधक समाज यांतील कार्याची माहिती घेणे.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांना प्रेरणा मिळणाऱ्या घटना व व्यक्ती:**

१९०७ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील हे ओगले ग्लास वर्क व किर्लोस्कर या कंपनीचे फिरते विक्रेते म्हणून काम करत होते. काम करत असताना त्यांनी जवळून समाज पाहिला आणि त्यांच्या लक्षात आले की समाज अंधश्रध्दा व अज्ञान यामध्ये अडकला असून यातून समाजाला बाहेर काढण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा उपाय नाही. इथून पुढे त्यांनी समाजकार्याचा ध्यास घेतला. तसेच ते काही शाहू महाराजांच्या वाड्यात आश्रयाला होते. तेव्हा त्यांनी जवळून समाजकार्य बघितले होते. शाहू महाराजांपासून त्यांना समाजकार्य करण्याची प्रेरणा मिळाली. कर्मवीरांच्या मामाचे मित्र सत्याप्पा यांच्याकडून त्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळाली. त्यांचे 'सत्यापाचे बंड' हे प्रकरण गाजले होते. एका गरोदर स्त्रीला एका माणसाने जनावरा सारखे मारले होते. ते सत्याप्पाला सहन झाले नाही. त्याने संतापून त्या माणसाला ठार केले व तो फरार झाला. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हा गुण त्यांनी सत्याप्पाकडून घेतला. तसेच त्यांच्यावर महात्मा फुले व त्यांनी सुरु केलेल्या सत्यशोधक समाजाचा त्यांच्यावर प्रभाव होता.

**कर्मवीरांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य:**

मोफत शाळा सुरु करण्याचे भाऊराव पाटील यांच्या डोक्यात चालुच होते. त्यासाठीची सुरुवात त्यांनी सातारा येथून केली. साताऱ्याला जाऊन ते शिकवण्या घेऊ लागले व इथूनच पुढे त्यांनी १९१० मध्ये दुधगाव शिक्षण प्रसारक मंडळ स्थापन केले. या संस्थेमार्फत सर्व जाति-धर्माच्या मुलांसाठी वसतिगृह सुरु केले. हे दुधगाव म्हणजेच सांगलीतील नेर्ले गावात दुधगाव विद्यार्थी आश्रम म्हणून

ओळखले जात होते. या आश्रमात कोणालाही प्रवेश मिळत असे. याचे अधिक्षक अण्णासाहेब लठ्ठे यांना केले होते. १९१९ मध्ये सत्यशोधक परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेतच भाऊरावांनी रयत शिक्षण संस्था स्थापन करण्याची घोषणा केली.

**रयत शिक्षण संस्था :**

गोरगरिबांना तसेच सर्व जातीतील मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी एखादी शिक्षण संस्था असावी असे भाऊरावांना वाटत होते. सर्व जाती- धर्मातील लोकांनी एकत्र बसून शिक्षण घेणे, मुलांना शिस्त लावणे, त्यांना व्यसनापासून दूर ठेवणे, त्यांच्यावर चांगले संस्कार करणे हे उद्देश ठेवून कर्मवीर व त्यांच्या सहकार्यांनी रयत शिक्षणसंस्था स्थापन करण्याचे ठरवले. ४ ऑक्टोबर १९१९ या दसऱ्याच्या शुभ दिवशी साताऱ्यात 'रयत शिक्षण संस्थेची' स्थापना केली. या संस्थेचे वटवृक्ष हे बोधचिन्ह स्वीकृत केले व 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' है ब्रीदवाक्य ठरवण्यात आले. दुधगाव शिक्षण प्रसारक मंडळ हे रयत शिक्षण संस्थेचे मुळ रोपटे मानले जाते. या संस्थेची 'कमवा व शिका' ही प्रमुख योजना आहे. ही संस्था स्थापण्यासाची प्रेरणा शाहू महाराजांकडून मिळाली.

**रयत शिक्षण संस्थेची उदिष्ट्ये:**

१) मागासलेल्या जातीत शिक्षणाची आवड निर्माण करणे.
२) मुलांना स्वावलंबी उद्योगी व शीलवान बनवणे.
३) मागासलेल्या जातीतील गरीब विदयार्थ्यांना मोफत निवासी शिक्षण देणे.
४) ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करणे.
५) अयोग्य रुढींना फाटा देऊन खऱ्या विकासाचे वळन लावणे.
६) एकोप्याचे महत्व पटवून कृतीने ते प्रत्यक्षात उतरवणे.
७) सर्व मुलांना शिक्षण घ्यवि यासाठी गरज पडेल तसे संस्थेचे कार्यक्षेत्र वाढवणे.

भाऊरावांनी ही उध्दिष्टे पूर्ण करण्यासाठी जमेल तेवढे प्रयत्न केले. स्वताची संपली पणाला लावली. एकदा तर त्यांच्या पत्नीचे मंगळसुत्रही गहाण ठेवले. कर्मवीरांनी प्रत्यक्ष कृतीतून उध्दिष्टे पूर्ण केली. भाऊरावांनी फक्त श्रमिक शिक्षणच नव्हे तर, समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदि मुल्यांची शिकवण विद्यार्थ्यांना दिली.

**वसतिगृहाची स्थापना:**

खेड्यापाड्यातून आलेल्या बहुजन समाजाच्या मुलां-मुलींच्या निवासाची आणि भोजनाची व्यवस्था व्हावी मणून वसतिगृहे सुरु केली. कर्मवीर भाऊराव पाटलांनी १९२४ मध्ये काले येथून सातारा येथे रयत शिक्षण संस्थेचे स्थलांतर केले. याच वर्षी 'छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' हे वसतिगृह स्थापन केले. गांधीजींच्या हस्ते याचे उदघाटन केले. आज या संस्थेच्या अनेक शाळा, माध्यमिक शाळा, अध्यापन विद्यालये, महाविद्यालये ज्ञानदानाचे कार्य करत आहेत. या वसतिगृहात विविध जातीतील मुले एकत्र राहू लागली. वसतिगृहात असलेले नियम व दिनचर्या यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबीवृत्ती, आत्मनिर्भरता आणि सन्मार्गी प्रवृत्ती निर्माण होण्यास मदत झाली. कर्मवीरांच्या या कार्यात त्यांच्या पत्नीने लक्ष्मीबाईंनी खूप हातभार लावला. एकदा वसतिगृहातील विद्यार्थ्यांना खाण्यासाठी काही नव्हते तेव्हा त्यांनी स्वतःचे मंगळसूत्र व दागिणे विकून मुलांची सोय केली. यावरुन त्यांची मुलांविषयीची तळमळ व त्यागाची कल्पना येते.

**मुष्टीफंड योजना :**

वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या अन्नाची सोय व्हावी म्हणून भाऊरावांनी मुष्टीफंड योजना सुरु केली. पूर्वी गावात पीठ दळण्यासाठी गिरण्या नव्हत्या. तेव्हा बायका पहाटे उठून जात्यावर धान्य दळायच्या. दळण दळण्यापूर्वी गृहिणी वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी जात्याच्या वरती खुंटीला अडकवलेल्या पिशवीत मूठभर अन्न टाकीत असत. प्रत्येक घरात असे होत असे. नंतर वसतिगृहातील मुले येऊन ते धान्य गोळा करून नेत असत. यामुळे मुलांच्या जेवणाची सोय होई.

**कमवा व शिका :**

वसतीगृहात राहणारी मुले गरीब रयतेची होती. अशा मुलांच्या राहण्याच्या व भोजनासाठीच्या खर्चासाठी अण्णांनी एक नवखा उपक्रम सुरु केला. त्याचे नाव होते 'कमवा आणि शिका' त्यातून मुलांना श्रमप्रतिष्ठेची दिक्षा तर मिळालीच परिणामी मुलांचे हात कामाला लागले. भाऊरावांचे वसतिगृह म्हणजे स्वावलंबी शिक्षणाचे एक कृतीशील प्रयोगकेंद्र आणि राष्ट्रीय एकात्मतेचा मोठा प्रयोग होता. महात्मा गांधीजींनी भाऊराव पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले आहे की,'जातिनिरपेक्ष असे सर्वांकरिता संयुक्त वसतिगृह काढून भाऊरावांनी नवमानव निर्मितीचा प्रयोग सुरु केला होता.

**भाऊराव पाटील यांनी काढलेल्या शाळा व कॉलेज:**

भाऊराव पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेक ठिकाणी विविध शाळा, कॉलेज, ग्रंथालये, वसतिगृहे सुरु केली. यासाठी त्यांना बऱ्याच समाजसुधारकांनी मदत केली. १९२८ मध्ये छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भेट दिली व २५,००० रु.ची देणगी दिली. गांधीजींनी हरिजन सेवक फंडातून वार्षिक ५००रु. ची मदत सुरु केली. १९३२ मध्ये पुणे कराराच्या स्मरणार्थ भाऊरावांनी युनियन बोर्डिंग हाऊसची स्थापना केली. १९३३ मध्ये सयाजीराव गायकवाड यांनी वसतिगृहास भेट देवून ४,००० रु.ची देणगी दिली. १९३५ मध्ये सातारा येथे सिल्व्हर जुबली रुरल ट्रेनिंग कॉलेजची स्थापना केली. पुढे याचे नाव महात्मा फुले अध्यापक विद्यालय असे दिले. हे खाजगी शिक्षण संस्थेतर्फे चालवले जाणारे पहिले ट्रेनिंग कॉलेज होते. १९३६ मध्ये सातारा येथे पहिली मराठी शाळा सुरु केली. याला रावबहादूर काळे यांचे नाव दिले.

१९३७ मध्ये प्रांतिक सरकारे स्थापन झाली. तेव्हा, मुंबई प्रांताच्या सरकारने साक्षरतेचा प्रसार करण्यासाठी खासगी शिक्षण संस्थांना प्रोत्साहन दिले. यामुळे भाऊराव पाटील यांनी अनेक ठिकाणी शाळा सुरु

केल्या. १९३८ मध्ये पहिली प्राथमिक शाळा यवतेश्वर, सातारा येथे सुरु केली. १९४० मध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या नावे मोफत वसतिगृहयुक्त माध्यमिक शाळा सुरु केली.

त्याचे नाव 'महाराजा सयाजीराव गायकवाड फ्री अॅन्ड रेसिडेन्शियल स्कूल' असे ठेवले. १९४१ मध्ये संस्थेमार्फत सातारा येथे लक्ष्मीबाई पाटील नावाने पहिले ग्रंथालय सुरु केले. १९४२ मध्ये सातारा येथे प्राथमिक शिक्षणासाठी स्वतंत्र जिजामाता अध्यापिका विद्यालय सुरु केले. १९४४ मध्ये आष्टेः सातारा येथे विजयसिंह वसतिगृह सुरु केले. १९४७ मध्ये छत्रपती शिवाजी महाविद्यालय सुरु केले. १९५० मध्ये लंडन मध्ये महात्मा गांधी वसतिगृहाची स्थापना केली. १९५३ मध्ये कर्मवीरांनी १०१ माध्यमिक शाळा सुरु करण्याचा संकल्प पूर्ण केला. १९५४ मध्ये संत गाडगेबाबा यांच्या नावाने कराडमध्ये महाविद्यालय सुरु केले. १९५५ मध्ये मौलाना आझाद सेकंडरी रिसर्च ट्रेनिंग कॉलेजची सुरुवात केली. येथे शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाई. १९५७ मध्ये लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शिक्षणोत्तजक पतपेढी स्थापन केली.

इ.स. १९८६-८७ अखेर संपूर्ण महाराष्ट्रभर १६ पूर्व प्राथमिक शाळा, ३२१ माध्यमिक विद्यालये, ८ अध्यापन विद्यालये, २९ महाविद्यालये, ७९ वसतिगृहे, ६ कार्यालये, ३७ इतर शाखा व एकूण शाखा ४९६ असा या रयत शिक्षण संस्थेचा पसारा आहे. आज ७५० पेक्षा जास्त शाखामधून जवळजवळ ५ लाखांपेक्षा जास्त विदयार्थी शिक्षण घेत आहेत. आशिया खंडातील सर्वात मोठी व शैक्षणिक गुणवत्ता निर्माण करणारी संस्था म्हणून तिचा नावलौकिक आहे. कर्मवीरांनी आपले बोधचिन्ह 'वटवृक्ष' ठेवले होते. त्याप्रमाणेच त्यांनी या वटवृक्षाला पाणी घालून आज अनेक पारंब्या फुटल्या आहेत.

**सत्यशोधक समाज आणि कर्मवीर भाऊराव पाटील:**

२४ सप्टेंबर १९७३ रोजी महात्मा जोतिराव फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्याचे कर्मवीर भाऊराव पाटील हे महत्वाचे सदस्य होते. जातीभेद उच्चाटन, ब्राम्हण वर्गाची मक्तेदारी कमी करणे, बहुजन समाजात शिक्षणप्रसार, अस्पृश्यांचा उध्दारः, अंधरूढीपरंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न या समाजाने केला. जोतिबाच्या अंतानंतर ही चळवळ थंडावली होती. तेव्हा राजर्षी शाहू महाराजांनी राजाश्रय दिला व याच्या पुढील काळात ही जबाबदारी कर्मवीरांनी घेतली. महात्मा फुलेंचे व शाहू महाराजांचे कार्य आपण स्वतःच्या खांदयावर घेण्याचे त्यांनी ठरवले. त्यांनी त्यासाठी जन-जागृतीचे कार्य केले.

सत्यशोधक चळवळीचा प्रसार व्हावा यासाठी त्यांनी सातारा, पुणे, विदर्भ व मराठवाडा भाग पालथा घातला व समाजाचा प्रसार केला. वर्षानुवर्षे चालत आलेल्या रुढीः परंपरा, अनिष्ट प्रथा पध्दती बंद पाडण्याचे जे कार्य महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, वि. रा. शिंदे यांनी सुरु केले होते ते भाऊरावांनी अखंडपणे केले व समाजात उद्बोधन करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरात 'सत्यधर्म हाच महाराष्ट्र धर्म' या विषयावर व्याख्यान दिले होते.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांची चतुःसुत्री:**

भाऊरावांनी शिक्षणाचा प्रसार करताना पुढील चतुःसूत्रींचा मार्ग अवलंबला होता.-

१) स्वावलंबन

२) स्वाभिमान

३) स्वाध्याय

४) स्वातंत्र्य

**मुल्यमापन:**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडे कोणत्याही विद्यापिठाची पदवी नव्हती. पण बहुजन समाजाची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती त्यांनी जवळून पाहिली होती. त्यासाठी समाजात बदल घडवून विकास साध्य करण्यासाठी त्यांनी शिक्षणरुपी गंगोत्री घरोघरी पोहोचवण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक प्रगती करण्यासाठी कृतीच्या माध्यमांतून त्यांनी प्रयत्न केला. शाळा, महाविद्यालये आठिण वसतिगृहातून केलेल्या विविध प्रयत्नातून त्यांचे शैक्षणिक तत्वज्ञान आकाराला आले. स्वावलंबी शिक्षणी किंवा 'कमवा आणि शिकवा' या नाविन्य उपक्रमातून त्यांनी विदद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवी दिशा ३ दिली. पैरने असतील तरच शिक्षण घेता येते. या प्रवृत्तीला खोडून काढले.

शिक्षणासोबतच त्यांनी समाजसुधारणेचाही मोठा प्रयत्न केलाः सत्यशोधक समाजाची तत्वे गाठीला बांधून त्यांनी ठिक-ठिकाणी जनजागृती केली. जाती-भेद, अस्पृश्यता यांच्या पलीकडे जाऊन त्यांनी सर्वांना एकत्र बांधून ठेवले. गोर-गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देऊन समाजात बदल घडवून आणला. त्यांच्या या कार्याबद्दल गौरवताना ह.रा. महाजनी त्यांना 'महाराष्ट्राचे बुकर-टी-वॉशिंग्टन' म्हणतात. त्यांच्या कार्यामुळे संत गाडगेबाबा यांनी जनतेच्या साक्षीने महात्मा गांधी व ग्रामीण विद्यापीठ येथे व भाऊराव पाटलांना 'कर्मवीर' ही पदवी दिली. त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा व लोकांना त्यांच्या त्याग व कष्टाची जाणीव व्हावी म्हणून हा शोधनिबंध. अशा या महान शिक्षणसूर्याची १ मे १९५९ रोजी प्राणज्योत मावळली.

**संदर्भ ग्रंथ :**


1. बा.ग. पवार : ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक कर्मवीर भाऊराव पाटील, मातृभूमी प्रकाशन, पुणे.
2. कडियाळ रा.अ.: कर्मवीर भाऊराव पाटील (काळ आणि कर्तव्य) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
3. K. Sagar : Social Reformers in Maharashtra, K. Sagar Publications, 2006.

4. कठारे अनिल, महाराष्ट्राचा समग्र इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड. डॉ.एस.एस. गाठाळ, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.